माध्यमिक शाळातील शैक्षणिक नवोप्रकमांचा विद्यार्थ्यांच्या जीवन कौशल्यावर होणारा परिणाम: एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत शिक्षणशास्त्र विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी च्या अंशतः पूर्ततेसाठी आंतरविद्याशाखेतर्गत सादर केलेला संशोधन अहवाल

संशोधिका

कांबळे मायादेवी उत्तम

मार्गदर्शक

डॉ.दिलीप मनोहर मुगळे

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

2019

१. प्रस्तावना:

जागतिकीकरणाच्या युगात आर्थिक बदलाबरोबरच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातही झपाट्याने बदल होताना स्पष्ट दिसतात. जागतिक स्तरावर शिक्षण क्षेत्राचा विचार करता उत्तरोत्तर उत्क्रांती होताना आपण पाहतो. अनेक ज्ञानशाखांच्या उदयासोबतच अनेक महत्वाचे बदल होत आहेत. जागतिक स्तरावर शिक्षणक्षेत्र सर्वोच्च बदलांची उंची गाठत असतानाच मुळ मानव हा अदिम युगापासून आजपर्यंत आपल्या वैयक्तिक, सामाजिक, गरजांच्या पुर्ततेकडे लक्ष ठेवून असतो. समाज हा मानवासाठी बनलेला असून मानव समाजाचा विकास करणे हा शिक्षणप्रणालीचा महत्वाचा उद्देश आहे. बदलत्या जिवनशैलीत मानवाला स्वतःच्या व्यक्तीमत्वातील समायोजकता आणि समाजातील आपले स्थान बळकट करण्यासाठी धडपडावे लागत आहे. मानवाच्या सर्वांगिण विकासासाठी तयार झालेली शिक्षण प्रणाली ही मानव जातीचा उद्धार करणारी असते. त्यातुन निसर्गाच्या नियमाप्रमाणे नाविण्याचा सतत शोध घेणे व शिक्षण क्षेत्रातील असलेल्या कौशल्य, कलागुणांचा विकास करणे हे उद्दिष्ट बनले आहे. २१ व्या शतकात ज्ञानाची क्षितीजे विस्तारली आहेत नाविण्याचा शोध घेणारी प्रत्येक पहाट उगवत आहे. आज जीवनाचा पाया मुल्याद्धिष्टीत असणारी, नाविण्याचा शोध घेणारी सर्जनशिल पिढी निर्माण करणे गरजेचे आहे. या स्पर्धात्मक युगात प्रत्येकजण स्वःअस्तित्व टिकवण्यासाठी सतत धडपडत आहे. जागतिकीकरणामुळे नाविण्याचा शोध व त्या शोधामुळे व्यक्तीमत्वाचा विकास त्याची उत्कृष्टता कशी वाढवता येईल यासाठी नवीन उपक्रमाचे प्रयोग शिक्षण क्षेत्रात नित्याने होताना आपण पाहत आहात. नवोपक्रमांमुळे शाळांतील चैतन्य फुलविण्यास मदत होते. अभ्यासपुरक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासात मोलाची भर पडतेच आणि त्यातूनच विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वास आकार मिळत असतो. RTE २००९ या शिक्षणहक्क कायद्यानुसार प्रत्येक मुल शिकले पाहिजे त्याचप्रमाणे शाळेत टिकले पाहिजे

यासाठी शालेय प्रशासन, शिक्षक पालक यांची प्रयत्न चालू असतात. अभ्यासक्रमांचे उद्दीष्ट्ये साध्य होण्याच्या दृष्टीने शिक्षक आप-आपल्या दृष्टीने प्रयत्न करतात. पाठ्यांशाचे विद्यार्थ्यांना आकलन व्हावे, पाठ्यांशानुसार विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य, उपयोगिता, अभिरूची, अभिवृत्ती, रसग्रहण या उद्दीष्ट पुर्तीसाठी प्रयत्न करत असतात आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होत असतो.

2) संशोधनाची गरज :-

आजच्या जीवनामध्ये सामाजिक, राजकिय, आर्थिक, सांस्कृतीक परिस्थितीमध्ये झपाटयाने बदल होत असतांना दिसतात. जागतिकीकरणाच्या युगात ज्ञानाच्या आफाट शाखंचा उदय होतोय हया बदलामुळे विद्यार्थी गोंधळून गेलेला आहे. पालकांच्या आणि शिक्षकांच्या मोठया अपेक्षांच्या ओझ्याखाली विद्यार्थी दडपला गेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्याला स्वत:ला समजून घेण्यीच क्षमता विकसित होण्यास अडचण निर्माण होते. विद्यार्थ्यांचा सार्वांगिण विकास करणे हे शिक्षणाचे अंतीम उद्दिष्ट मानले जाते. त्या सर्वांगिण विकासामध्ये मानसिक क्षमातांचा जास्तीत जास्त उपयोग करून शिक्षण अधिकाधिक जीवनकेंद्रीत करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास साधता येतो. व्यक्तिविकास हा चारित्र्यानिर्मीतीशी निगडीत असतो. चारित्र्याची उत्तम प्रकारे जडणघडण होण्यासाठी मानवाला महत्वपुर्ण जीवन कौशल्याची आवश्यकता आहे. म्हणून जीवन कौशल्यांचा विकास शिक्षणातून होणे गरजेचे आहे.

प्राथमिक शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या विकासात पुरक अनेक उपक्रम घेताना दिसतात परंतु माध्यमिक स्तरावर विद्यार्थी अध्यायन करतातन किशोरवयीन मुलांच्या आंतरीक शक्ती आणि गुणवैशिष्टयांची जाणीव होण्यास मदत करणे त्यात आवश्यकते नुसार बदल करणे दैनंदिन जीवनात मुलांना येणाऱ्या अडचणी व समस्या यावर विचारपुर्वक निर्णय घेवून त्यामधून योग्य यशस्वी मार्ग काढण्यास समर्थ करणे.

आजच्या काळाची गरज आहे. यासाठी किशोरवयीन मुलांच्या अभ्यासक्रमात जीवन कौशल्यांचा विकास कसा होतो. जीवन कौशल्यविकासाठी शाळा स्तरावर घेतले जाणारे उपक्रम त्याचा परिणाम अभ्यासने येथे आवश्यक आहे.

3) संशोधनाचे महत्व :-

माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमातून किशोरवयीन मुलांच्या व्यक्तीमत्वाचा निर्णायक वळण मिळते. मूलांच्या सुप्त गूणांचे सकारात्मक नकारात्मक प्रकटीकरण प्रकर्षाने या स्तरावर होत असते. परिसरातील घटना, कृती, प्रसंग इत्यादीबाबत सहज व विचारपुर्वक निर्णय घेण्याची ताणतणाव विरहीत जीवन जगता येण्याची क्षमता त्यासोबतच आजू- बाजूस घडत असलेल्या घटनांचा विचार करून त्यावर तर्क, निष्कर्ष काढण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये सिध्द करणे हे माध्यमिक शिक्षणाचे अविभाज्य उद्दिष्ट हे साध्य करतांना नवोपक्रमांची सांगड घालणे म्हणजे या उद्दिष्टांची परिपुर्ततेकडे महत्वाची झेप घेणे आहे.

विद्यार्थ्यांना तसेच सर्वसामान्य व्यक्तीला जीवन आणि शिक्षण यांची सांगड घालतांना जीवन कौशल्यांचा उपयोग होत असून त्यामध्ये आणखी मोठया प्रमाणात विकास होणे अपेक्षित आहे. यशस्वी जीवन जगण्यासाठी विचार पुर्वक शिक्षणांची प्रशिक्षणाची व कौशल्य विकसनाची अत्यंत गरज आहे. तसेच जीवन कौशल्यांमुळे जीवन जास्तीत जास्त कार्यक्षमपणे व यशस्वी जगता येते.

विद्यार्थ्यांना दिले जाणारे शिक्षण हे जीवनकेंद्रीत केले पाहिजे. विद्यार्थ्यांचा बोधात्मक, भावात्मक व कार्यात्मक एकंदरीत सर्वांगिण विकास होण्यासाठी जीवन कौशल्यांचा विकास माध्यमिक शाळांमध्ये वर्गामध्ये योग्य त्या वातावरण नवोपक्रमांसह होणे आवश्यक असते. 2009 पासून प्राथमिक व माध्यमिक

शिक्षणाच्या अभ्यासक्रमात 10 जीवन कौशल्यांचा समावेश करण्यात आला आहे. आजच्या अधुनिक युगात व्यक्तीला प्रभावीपणे जीवन जगण्यासाठी शालेय अभ्यास क्रमाव्दारे जीवन कौशल्यांचा विकास परिणामकारक अभ्यासता यावे यासाठी या संशोधनाचे महत्व आहे.

4) समस्या विधान :-

माध्यमिक शाळातील शैक्षणिक नवोपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या जीवनकौशल्यावर होणारा परिणाम एक अभ्यास

5) कार्यात्मक व्याख्या :-

1) माध्यमिक शाळा :-

शालेय आकृतिबंध 9 वी 10 वी चे वर्ग असणारी शासन मान्यता प्राप्त माध्यमिक वर्गाच्या शाळा.

2) शैक्षणिक नवोपक्रम :-

किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमातील जीवन कौशल्यांचा विकास करताना पारंपारिक पध्दतीपेक्षा, नाविन्यपुर्ण मार्ग वापरून केलेले सृजनशील उपक्रम म्हणजे नवोपक्रम होय.

3) जीवन कौशल्य :-

दैनंदिन जीवनातील कठीण प्रसंग आणि समस्यांना सक्षमपणे सामोरे जाताना व्यक्तीला अनुकूल आणि सकारात्मक वर्तनासाठी मदत करणाऱ्या क्षमता म्हणजे जीवन कौशल्य होय.

4) **परिणाम**- नवोपक्रम प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांच्या वर्तनात हळूहळू होणारा बदल म्हणजे परिणाम

5) **अभ्यास** – एखाद्या विषयातील सखोल ज्ञान किंवा मार्ग जाणण्यासाठी सर्व बाजूंनी केलेली गुणदोषात्मक मीमांसा म्हणजे अभ्यास होय.

6) उदिष्ट :-

1) माध्यमिक शिक्षणातील नवोपक्रमाचा समस्या निराकरण या जीवन कौशल्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.
2) माध्यमिक शिक्षणातील नवोपक्रमाचा निर्णय क्षमता या जीवन कौशल्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.
3) माध्यमिक शिक्षणातील नवोपक्रमाचा सर्जनशिल विचार या जीवन कौशल्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.
4) माध्यमिक शिक्षणातील नवोपक्रमाचा चिकीत्सक विचार या जीवन कौशल्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.
5) माध्यमिक शिक्षणातील नवोपक्रम आणि समस्या निराकरण, निर्णय क्षमता, सर्जनशिल विचार, चिकीत्सक विचार या जीवन कौशल्याचा तुलनात्मक अभ्यास करणे.

7) संशोधन परिकल्पना :-

1) माध्यमिक शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या समस्या निराकरण कौशल्यांवर नवोपक्रमाचा परिणाम दिसून येईल.
2) माध्यमिक शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या निर्णय क्षमता कौशल्यांवर नवोपक्रमाचा परिणाम दिसून येईल.
3) माध्यमिक शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशील विचार कौशल्यांवर नवोपक्रमाचा परिणाम दिसून येईल.
4) माध्यमिक शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या चिकित्सक विचार कौशल्यांवर नवोपक्रमाचा परिणाम दिसून येईल.

8) संशोधनाची व्याप्ती :-

1) प्रस्तुत संशोधनात लातूर शहरातील माध्यमिक शालेय स्तरावरील इयत्ता 9 व 10 वी या वर्गातील विद्यार्थ्यांचा विचार करण्यात येईल.
2) प्रस्तुत संशाधन हे लातूर शहरातील माध्यमिक शाळांशी संबंधित आहे.
3) प्रस्तुत संशोधनामध्ये मराठी माध्यमांच्या शाळांचा विचार यामध्ये करण्यात आला आहे.
4) सदरील संशोधन हे 2019-22 या कालावधीतील राबविल्या जाणाऱ्या शैक्षणिक नवोपक्रमाशी संबंधित असेल.
5) प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चार जीवनकौशल्याशी संबंधित असणार आहे.

9) संशोधनाच्या मर्यादा :-

1) प्रस्तुत संशोधन हे लातूर शहरापुरते मर्यादित असेल.
2) प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळांमधील इयत्ता 9 वी व 10 वी या वर्गातील विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.
3) प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चार जीवनकौशल्याचा विचार यात केला जाणार आहे.
4) सदरील संशोधन हे 2019-24 या कालावधीतील राबविल्या जाणाऱ्या शैक्षणिक नवोपक्रमाशी मर्यादित असेल.
5) प्रस्तुत संशोधनात लातूर शहरातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळांचा विचार केला जाणार आहे.

10) संशोधनाची परिमर्यादा –

1) प्रस्तुत संशोधनात लातूर विभागातील फक्त लातूर शहराचा अभ्यास केला आहे.
2) प्रस्तुत संशोधनात मराठी माध्यमिक शाळा व्यतिरिक्त इतर माध्यमांच्या शाळांचा विचार केला जाणार नाही.
3) प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील इतर जीवनकौशल्या चा विचार केला जाणार नाही.

11)संशोधन पध्दती :-

संशोधनाच्या अनेक पध्दती आहेत. त्यामध्ये सर्वेक्षण पध्दती, ऐतिहासीक पध्दती, प्रायोगिक पध्दती प्रस्तुत संशोधन पध्दती इत्यादी पद्धती वापरल्या जातात.

प्रस्तुत संशोधनात संशोधीकेने बहुविध संशोधन पद्धतीचा वापर करणार आहे या मध्ये प्रायोगिक संशोधन पध्दती व सर्वेक्षण संशोधन पद्धती चा अवलंब करण्यात येणार आहे.सर्वेक्षण पद्धत ही शैक्षणिक संशोधनाची दुसरी प्रमुख पद्धती होय , शैक्षणिक संशोधनात या पद्धतीचा प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो पाश्चिमात्य राष्ट्रात आणि भारतात सर्वेक्षण पद्धतीचा वापर बहुसंख्येने केला जातो

" विशिष्ट बाबतीत असलेली सध्यस्थित जाणून घेण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या संशोधन पद्धतीला सर्वेक्षण पद्धती असे म्हणतात "

प्रायोगिक पध्दती ही एक वैज्ञानिक संशोधन पध्दत असून शैक्षणिक संशाधनात तिचा महत्वपुर्ण उपयोग होतो. विशिष्ट परिणाम दिसतो या परीकल्पनेचे निव्वळ परिक्षण केले जात असून इतर सर्व घटकांना प्रायोगिक गट करून फक्त एक घटकाच्या उपयोगाने कोणता बदल होऊ शकतो ह पाहण्यासाठी कलेला प्रयोग हे या पध्दतीचे वैशिष्टे होय.

12) संशोधनाची साधने :-

प्रस्तुत संशोधनातील माहिती संकलन माहिती विश्लेषण यासाठी संशोधिकेने प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वार करणार आहे. यात टी-टेस्ट प्रि टेस्ट, पोस्ट टेस्ट, प्रमाण विचलन अशा साधनांचा वापर यात करण्यात येईल. त्यासोबतच प्रमाणित चाचण्या यात npc आग्रा यांची विशाल सूद यांनी प्रमाणित केलेली सामाजिक जीवन कौशल्य विषयक दृष्टीकोन मापिका या सारख्या साधनांचा संशोधनासाठी वापरण्यात येणार येईल.

13) जनसंख्या :-

1) प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने जनसंख्या निवड संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील लॉटरी पध्दतीचा वापर करून जनसंख्या निवडण्यात येणार आहे.

2) प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने लातूर शहरातील मराठी माध्यमिक शाळेतील इयत्ता 9 वी व 10 वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची जनसंख्या म्हणून निवड केली आहे.

14) न्यादर्श/नमुना निवड :-

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने सहेतूक नमुना निवड पध्दतीने नवोपक्रमशील शाळांची निवड करणार असून माध्यमिक शाळेतील इयत्ता 9 व 10 वी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थी यांची न्यादर्श म्हणून निवड केली जाणार आहे.

अनुक्रमांक	विद्यार्थी		एकूण
1	मुले	मुली	
	200	200	400

15) माहितीचे संकलन व अर्थ निर्वचन :-

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या प्रि टेस्ट पोस्ट टेस्ट प्रमाणित चाचण्यांचा वापर सदरील माहितीवर प्रक्रिया करून अर्थनिर्वचन करण्यात येईल.

16) सांख्यकिय परिमाने :-

प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक व अनुमानात्मक सांख्यिकीय तंत्राचा वापर केला जाईल यासाठी MS-EXCEL, SPSS याचा उपयोग केला जाईल.गुणात्मक माहितीचे विश्लेषण वर्णनात्मक पद्धतीने आशय विश्लेषण, सारांकन इ.द्वारे सादर केले जाईल.

सर्वेक्षणातून जी माहिती संकलित केली जाईल त्या माहितीच्या विश्लेषण व अर्थनिर्वाचनासाठी शेकडेवारी व प्रायोगिक प्रायोगिक संशोधनातील विश्लेषण अर्थनिर्वचन साठी मध्यमान, सहसंबंध गुणक ,प्रमाणविचलन ,T परीक्षिका ,आलेख इत्यादी सांखिकीय परिमाणे वापरण्यात येणार आहेत.

17) कार्यवाहीचे टप्पे :-

संशोधन कार्य करीत असतांना नियोजन करणे हे अत्यंत महत्वाचे असते. संपूर्ण सशोधनाची ब्ल्यू प्रिन्ट म्हणून आरखडा मांडत असतो. यामध्ये प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वप्रथम समस्येचा शोध घेवन समस्या निश्चित करणे, समस्या संशोधनाची गरज व महत्त्व काय आहे ते ठरवणे नंतर संशोधनाचे गृहीतके संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा कशी आहे. त्याची मांडणी करणे.

त्यानंतर संबंधीत संशोधन समस्या संदर्भात विविध साहित्यांचा आढावा घेणे, संशोधनासाठी उद्दीष्ठानुसार संशोधन पध्दती निवडणे संशोधनाची साधणे निर्माण करणे, निवडलेल्या संशोधन पध्दतीनुसार माहितीचे संकलन करणे, कच्च्या मिळालेल्या माहितीचे अर्थ निर्वाचन करून माहितीचे विश्लेषण करणे, प्राप्त माहितीची शेकडेवारी आलेख या संख्याशास्त्रीय परिमानांचा वापर करून मांडणी करणे. शेवटी संशोधनाची निष्कर्ष मांडणे संशोधनातील शिफारशी मांडणे आणि पुढील संशोधनासाठी संशोधकांना विषय सुचविणे.

18) वेळापत्रक :-

अ.क्र.	संशोधन कार्य	कालावधी (महिने)
1	नोंदणी	2 महिने
2	संशोधन समस्या अभ्यस	3 महिने
3	संबंधित साहित्याचा, संशोधनाचा आढावा	6 महिने
4	प्रश्नावली, प्रमाणित चाचण्या, मुलाखत सुची तयार करणे	5 महिने
5	माहितीचे संकलन करणे	6 महिने
6	माहितीचे अर्थनिवेचन	6 महिने
7	अहवाल लेखन	6 महिने
8	प्रबंधक सादरीकरण	6 महिने

19)**अंदाजपत्रक :-**

अ.क्र.	तपशिल	खर्च
1	पीएच.डी. प्रवेश शुल्क	20,000
2	संबंधीत साहित्याचा आढावा	5,000
3	संदर्भ ग्रंथ खरेदी	10,000
4	झेरॉक्स	10,000
5	टंकलेखन	15,000
6	प्रबंध प्रती	20,000
7	प्रवास खर्च	30,000
8	माहिती संकलन	15,000
9	प्रबंध दाखल करणे	5,000
	एकुण	**1,30,000**

19) संदर्भ सुची :-

1. भिताडे वि.रा.-2006, शैक्षणिक संशोधन पध्दती, नित्यनुतन प्रकाशन पुणे.
2. डॉ.ह.ना.जगताप -2011, शैक्षणिक मुल्यमापन, कोल्हापूर.
3. डॉ.मीना मंगरूळकर, प्रा.कमलादेवी आवटे – 2011, भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण, कोल्हापूर.

4. डॉ. सुरेश करंदीकर, डॉ. ह.ना. जगताप -2011, अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र, कोल्हापूर
5. पंडीत बी.व्ही.- 2010 शिक्षणातील संशोधक, नित्युतन प्रकाशन पुणे.
6. बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार अधिनियम- 2009, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई-32
7. डॉ. आगलावे प्रदीप -2000, संशोधन पध्दती शास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर

संशोधक	**मार्गदर्शक**
कांबळे मायादेवी उत्तम	**डॉ.मुगळे डी.एम.**